# १०४व्या वार्षिक अहवालाचा गोषवारा -

**माननीय सभासद,**

आपल्या बँकेचा आर्थिक वर्ष २०२१-२२चा १०४वा वार्षिक अहवाल सादर करताना संचालक मंडळाला आनंद होत आहे.

## १. जागतिक अर्थव्यवस्था व भारत

गतवर्षातील तीव्र मंदीनंतर जगभरातील अर्थव्यवस्थांत आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये लक्षणीय सुधारणा दिसून आली. उत्पादनांच्या मागणीत होत असलेली वाढ व अर्थव्यवस्थेतील निर्बंध शिथिलीकरण याचे पाठबळ अर्थव्यवस्थेस मिळाले. तसेच जगभरातील मध्यवर्ती बँकांनी आर्थिक विकासास प्राधान्य देताना व्याजदर दीर्घ काळ कमी राखले. याचाही सकारात्मक परिणाम अर्थव्यवस्थेवर दिसून आला. वर्ष २०२१ मध्ये जागतिक अर्थव्यवस्था ६.१ टक्क्यांनी वाढली, तर जगातील महत्त्वाच्या अर्थव्यवस्था म्हणजेच अमेरिकन, युरोपियन व चीन या देशांच्या अर्थव्यवस्था ५.७ टक्के, ५.३ टक्के व ८.१ टक्क्यांनी वाढल्या.

जागतिक परिस्थिती पूर्वपदावर येत असतानाच विविध उत्पादनांच्या पुरवठा साखळीतील अडथळे, अर्थव्यवस्थेतील अतिरिक्त तरलता तसेच खाद्यान्न व इंधनाच्या सातत्याने वाढत असलेल्या किमतींमुळे अनेक देशांतील चलनवाढीचा दर हा उच्च पातळीवर राहिला. या चलनवाढीस आळा घालण्यासाठी अमेरिकन फेडरल रिझर्व्हसह अन्य मध्यवर्ती बँकांनी आर्थिक शिथिलीकरण गुंडाळण्यास सुरुवात केली. त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर दिसून आला व वेगाने वाढत असलेल्या अर्थव्यवस्था काहीशा मंदावल्या. तसेच वर्ष २०२२च्या पहिल्या तिमाहीत काही देशांमधील भू-राजकीय संघर्षांमुळेही अर्थव्यवस्था वाढीचा वेग अजूनही कमी झाला.

### आर्थिक वर्ष २०२१-२२ मधील भारतीय अर्थव्यवस्था:

भारतामध्ये कोव्हिड-१९चा मोठा प्रभाव असतानाही अर्थव्यवस्था वाढीचा वेग बऱ्याच अंशी स्थिर राहिला. किंबहुना, मोठ्या प्रमाणावर झालेले लसीकरण व टाळेबंदीचे कमी झालेले प्रमाण यामुळे भारताचा सकल राष्ट्रीय उत्पादन (GDP) दर हा गतवर्षीच्या तुलनेत मजबूत होण्यास मदत झाली. पूर्वपदावर येत असलेली अर्थव्यवस्था, उत्पादनांच्या मागणीत होत असलेली वाढ आणि पोषक आर्थिक व वित्तीय धोरण यांचाही सकारात्मक परिणाम अर्थव्यवस्थेवर दिसून आला.

भारताचा सकल राष्ट्रीय उत्पादन (GDP) दर गतवर्षीच्या उणे ८.७ टक्क्यांवरुन आर्थिक वर्ष २०२१-२२मध्ये ८.९ टक्क्यांवर पोहोचला. कृषी क्षेत्राने खरीप हंगामातील विक्रमी अन्नधान्य उत्पादन, अनुकुल मॉन्सून तसेच सरकारच्या सकारात्मक धोरणांमुळे ३.९ टक्के इतकी वाढ दर्शविली. सेवा क्षेत्रामध्ये प्रवास / पर्यटन यांसारखी काही क्षेत्रे पूर्ण क्षमतेने सुरु झालेली नसतानाही आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये ८.२ टक्के इतकी वाढ झाली तर उद्योग क्षेत्राने उत्पादन, बांधकाम व खाण क्षेत्रांमधील तेजीच्या जोरावर ११.८ टक्के विस्तार दर्शविला.

### वित्तीय बाजार विश्लेषण:

एकूणच, आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये भारतीय अर्थव्यवस्था कोव्हिड-१९ पूर्व काळाच्या स्तरावर परतू लागली. केंद्र सरकारनेही अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी पोषक धोरण अवलंबिले. अर्थव्यवस्थेतील कमजोर क्षेत्रांचे सक्षमीकरण तर दुसरीकडे पायाभूत सुविधांवरील भांडवली खर्चात लक्षणीय वाढ करुन अर्थव्यवस्थेच्या दीर्घकालीन विस्तारावर भर देण्यात आला.

भारतीय रिझर्व्ह बँकेनेही वित्तीय बाजाराच्या स्थिरतेकरिता मुबलक तरलता उपलब्ध करुन दिली.

G-SAP १.० आणि २.०, ऑपरेशन TWIST इत्यादी योजनांद्वारे बाजारातील तरलता योग्य प्रमाणात राखण्यात आली. याशिवाय, व्याजदर स्थिर ठेवून पतधोरणात कुठलेही बदल करण्यात आले नाहीत, जेणेकरुन अर्थव्यवस्थेस चालना मिळेल. अशाप्रकारे भारतीय रिझर्व्ह बँकेने अर्थव्यवस्था वाढीस पाठबळ देण्याचे धोरण कायम ठेवले. परंतु, हे करत असतानाच पतधोरणात लवचिकता ठेवून Variable Rate Reverse Repoचे व्याजदर हळूहळू वाढवून रेपो व्याजदराच्या जवळ नेले. याद्वारे, भारतीय रिझर्व्ह बँकेने, विकासाला प्राधान्य देत व्याजाचे दरही वित्तीय बाजाराशी सुसंगत राहतील हे बघितले.

या सर्व पार्श्वभूमीवर, भारतीय अर्थव्यवस्था गतीमान झाली. परंतु, दुसऱ्या बाजूस पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे चलनवाढीचा दरही हाताबाहेर जाऊ लागला. जागतिक स्तरावरही इंधन व वस्तूंच्या किमतीत सातत्याने वाढ होत असल्याने चलनवाढ आवाक्याबाहेर जाऊ लागली. त्यातच, रशिया-युक्रेनमधील युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किंमतीतही झपाट्याने वाढ होऊन आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत कच्च्या तेलाचे दर १४० अमेरिकन डॉलर प्रति बॅरलवर गेले. सध्या तेलाचे दर काही प्रमाणात खाली आलेले असले तरी अजूनही ते वरच्या पातळीवरच आहेत. एकूणच, चलनवाढीचा दर हा आर्थिक वर्षअखेरीस भारतीय रिझर्व्ह बँकेच्या समाधानकारक पातळीच्या म्हणजेच ४ टक्क्यांच्या (+ / -२ टक्के) वर राहिला. नवीन आर्थिक वर्षातही चलनवाढीच्या दराने ७ टक्क्यांची पातळी ओलांडली आहे.

वित्तीय आघाडीवर, कॉर्पोरेट क्षेत्राच्या नफ्याच्या पार्श्वभूमीवर वाढलेला कर-महसूल व जीएसटी (GST) कर-संकलनात होत असलेली वाढ, यांच्या परिणामी वित्तीय परिस्थिती बऱ्याच अंशी रुळावर राहिली. तर खर्चाचा भर हा प्रामुख्याने पायाभूत सुविधा म्हणजेच रेल्वे, रस्ते, गृहनिर्माण इत्यादी बाबींवर देण्यात आला. आर्थिक वर्षात वित्तीय तूट (Fiscal Deficit) ही ६.९ टक्क्यांवर राहिली, जी मागील वर्षापेक्षा कमी प्रमाणात होती.

आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये चालू खात्यातील तूट (Current Account Deficit) मात्र रुंदावली. आयात-निर्यात व्यापारातील तूट, इंधनाचे चढे दर व सोन्याच्या आयातीतील वाढ, ही चालू खात्यातील तूट वाढण्याची प्रमुख कारणे आहेत.

जागतिक बाजार आर्थिक वर्षाच्या बहुतांश काळ स्थिर राहिले. परंतु आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत कोव्हिड-१९ काळात राबविलेल्या नरमाईच्या पतधोरण प्रक्रियेच्या परावर्तनाच्या सुरुवातीमुळे व रशिया-युक्रेन युद्धामुळे अस्थिरता निर्माण झाली. देशांतर्गत रोखे-व्याजदर हा बाजारातील अतिरिक्त तरलतेमुळे वर्षाच्या पहिल्या सहामाहीत स्थिर राहिला व त्यानंतर चलनवाढीच्या दरात होणारी वेगवान वाढ, केंद्र सरकारचा रोखे बाजारातून आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी मोठ्या प्रमाणावर कर्ज उभारण्याचा मानस, अमेरिकन फेडरल रिझर्व्हने नरमाईच्या पतधोरणापासून घेतलेली फारकत व देशांतर्गत चलनवाढीचा वाढता दर ह्या विविध कारणांमुळे दि. ३१ मार्च, २०२२ला ६.८४ टक्क्यांवर पोहोचला. भारतीय शेअर निर्देशांक वर्षभर अतिरिक्त तरलता व देशांतर्गत वित्तीय संस्थांची सातत्यपूर्ण गुंतवणूक या पार्श्वभूमीवर दि. ३१ मार्च, २०२२ रोजी ५८,५६८ (Sensex) व १७,४६४ (Nifty) या उच्चांकी पातळीवर पोहोचले. भारतीय रुपया अमेरिकन डॉलरच्या तुलनेत वर्ष अखेरीस ७५.७४ वर स्थिरावला. गतवर्षीपेक्षा अहवालवर्षी रुपयाचे मूल्य ३.५ टक्क्यांनी घटले. भारताच्या मुबलक परकीय चलनसाठ्यामुळे (६४२ अब्ज अमेरिकन डॉलर) रुपयाचे अवमूल्यन काही प्रमाणात रोखले गेले.

**सर्वंकष मूल्यमापन:**

आर्थिक वर्ष २०२१-२२ हे जागतिक अर्थव्यवस्थेसाठी पुनरुज्जीवनाचे वर्ष होते. विविध उत्पादनांच्या मागणीत होत असलेली वाढ आणि मध्यवर्ती बँकांचे नरमाईचे पतधोरण यामुळे अर्थव्यवस्थेची आश्वासक मार्गक्रमणा सुरु होती. परंतु रशिया-युक्रेन संघर्षामुळे नवीन आव्हाने अर्थव्यवस्थेपुढे उभी राहिली. युद्धामुळे घालण्यात आलेले जागतिक निर्बंध व त्याचे भविष्यातील आर्थिक परिणाम यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेची गती आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये खुंटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

भारतीय अर्थव्यवस्था आर्थिक वर्ष २०२२-२३च्या सुरुवातीपासूनच वाढत्या चलनवाढीचा सामना करीत आहे. ही चलनवाढ भारतीय रिझर्व्ह बँकेने प्रमाणित केलेल्या समाधानकारक दरापेक्षाही वरच्या पातळीवर आहे. त्यातच इंधनाचे दरही १०० अमेरिकन डॉलर प्रति बॅरलच्या आसपास असल्याने चलनवाढीचा दर अजूनही भडकण्याची शक्यता आहे. त्यास प्रतिसाद म्हणून भारतीय रिझर्व्ह बँकेनेही आर्थिक वर्ष २०२२-२३च्या पहिल्या पतधोरण आढाव्यात चलनवाढ रोखण्यास प्राधान्य दिले आहे. या आढाव्यात किरकोळ महागाई दराचे लक्ष्य ४.५ टक्क्यांवरुन ५.७ टक्के असे वरच्या पातळीवर नेले आहे. तर आर्थिक विकासदराचा अंदाज हा ७.८ टक्क्यांवरुन घटून ७.२ टक्के इतका केला आहे. जागतिक आर्थिक निर्बंधातील वाढ, पुरवठा-साखळीतील अडचणी व रशिया-युक्रेन युद्ध यांच्या पार्श्वभूमीवर हे सुधारित अंदाज जाहीर करण्यात आले आहेत.

या घडामोडींच्या परिणामी, येत्या काळात पतधोरणाची दिशा ही नक्कीच कठोर असेल. भारतीय रिझर्व्ह बँकेने याचे प्रत्यंतर, वाढत्या चलनवाढीला आळा घालण्यासाठी, रेपो व्याजदरात ४० अंकांची तर रोख राखीवता प्रमाणात (Cash Reserve Ratio) ५० अंकांची वाढ अचानक जाहीर करुन दाखविले आहेच. यापुढील व्याजदर वाढ ही उत्पादनांच्या मागणीवर व चलनवाढीच्या दरावर अवलंबून असेल. भारतीय रिझर्व्ह बँक ही विकास व महागाई या दोन्हीचा समतोल राखण्याचा प्रयत्न करेल. त्याचबरोबर विदेशी निर्गुंतवणूक रोखणे व विदेश विनिमय दर नियंत्रणात ठेवणे, या बाबींवरही भारतीय रिझर्व्ह बँकेचे लक्ष असेल.

भारतीय अर्थव्यवस्था अनेक धक्के पचवूनही तिच्या मूलभूत आर्थिक क्षमतेमुळे आजही भक्कम स्थितीत आहे. कृषी आणि औद्योगिक क्षेत्रातील तेजीमुळे वर्षभरातच कर्जाच्या मागणीत वाढ दिसून आली आहे. मेक इन इंडिया व आत्मनिर्भर भारत या सरकारच्या योजना तसेच पायाभूत सुविधांवर वाढलेला खर्च इत्यादींचे अर्थव्यवस्थेवर होणारे अनुकुल परिणाम येत्या काळात दिसून येतील. या विविध उपायांमुळे नवीन रोजगार-निर्मिती, उत्पन्नात वाढ - विशेषत: ग्रामीण उत्पन्नात आणि उत्पादनाला मागणी, अशा अर्थव्यवस्थेतील अनेक घटकांना चालना मिळेल. याच्या परिणामी अर्थव्यवस्थेची गती साधारणत: दुसऱ्या तिमाहीनंतर जोर पकडेल. तोपर्यंत जागतिक परिस्थितीतील अनिश्चितताही कदाचित संपुष्टात येईल.

## २. आर्थिक वर्ष २०२१-२२ मधील आपल्या बँकेच्या कार्यसिद्धीची ठळक वैशिष्ट्ये

- बँकेचा एकूण व्यवसाय दि. ३१ मार्च, २०२१च्या ₹ ६७,०९७.०० कोटींवरून दि. ३१ मार्च, २०२२ रोजी ₹ ७१,५७३.०२ कोटींवर पोहोचला. व्यवसायातील ही वाढ ₹ ४,४७६.०२ कोटी म्हणजेच ६.६७ टक्के इतकी आहे.

- बँकेच्या एकूण ठेवी दि. ३१ मार्च, २०२१च्या ₹ ४०,८५५.३० कोटींवरुन दि. ३१ मार्च, २०२२ रोजी ₹ ४२,८७०.५३ कोटींवर पोहोचल्या. ठेवींमधील वाढ ही ₹ २,०१५.२३

कोटी म्हणजेच ४.९३ टक्के इतकी आहे. बँकेच्या कासा (CASA) ठेवींमध्ये ८.६९ टक्क्यांची म्हणजेच ₹ १,०८५.८२ कोटींची वाढ होऊन दि. ३१ मार्च, २०२१च्या ₹ १२,४९७.७६ कोटींवरुन दि. ३१ मार्च, २०२२ रोजी कासा ठेवी ₹ १३,५८३.५८ कोटींवर पोहोचल्या.

- बँकेचा एकूण कर्ज-व्यवहार दि. ३१ मार्च, २०२१च्या ₹ २६,२४१.७० कोटींवरुन दि. ३१ मार्च, २०२२ रोजी ₹ २८,७०२.४९ कोटींवर पोहोचला. कर्ज-व्यवसायातील ही वाढ ₹ २,४६०.७९ कोटी म्हणजेच ९.३८ टक्के इतकी आहे. बँकेच्या किरकोळ (Retail) व व्यावसायिक (Wholesale) या दोन्ही कर्ज-व्यवसायांत अनुक्रमे ९.०४ टक्के व १०.०३ टक्के इतकी वाढ झाली. बँकेच्या कर्जांचे ठेवींशी असलेले प्रमाण (CD Ratio) दि. ३१ मार्च, २०२१च्या ६४.२३ टक्क्यांवरुन दि. ३१ मार्च, २०२२ रोजी ६६.९५ टक्क्यांवर पोहोचले.
- बँकेचा निव्वळ नफा दि. ३१ मार्च, २०२१च्या ₹ २७०.२४ कोटींवरुन दि. ३१ मार्च, २०२२ रोजी ₹ २७५.०२ कोटींवर पोहोचला.
- बँकेची ढोबळ अनुत्पादित कर्जे दि. ३१ मार्च, २०२१च्या ₹ १,२००.५८ कोटींवरुन कमी होऊन दि. ३१ मार्च, २०२२ रोजी ₹ १,१०६.६२ कोटींवर पोहोचली. त्यामुळे ढोबळ अनुत्पादित कर्जांचे एकूण कर्जांशी असलेले प्रमाणे गतवर्षीच्या ४.५८ टक्क्यांवरुन अहवालवर्षी ३.८६ टक्के असे सुधारले. तर निव्वळ अनुत्पादित कर्जांचे एकूण कर्जांशी असलेले प्रमाण गतवर्षीच्या १.०४ टक्क्यांवरुन अहवालवर्षी ०.६५ टक्के इतके झाले.
- अहवालवर्षी बँकेच्या स्वनिधीत ६.२० टक्क्यांची वाढ होऊन दि. ३१ मार्च, २०२१च्या ₹ ३,९३७.३४ कोटींवरुन दि. ३१ मार्च, २०२२ रोजी ₹ ४,१८१.५४ कोटींवर पोहोचला.
- दि. ३१ मार्च, २०२२ रोजी बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) १३.९४ टक्के इतके राहिले. भारतीय रिझर्व्ह बँकेने प्रमाणित केलेल्या ९ टक्क्यांपेक्षा ते अधिक आहे.

## ३. विभागवार कामगिरी

### (i) रिटेल बँकिंग:

- **किरकोळ कर्जे:**

  किरकोळ कर्जव्यवसायाअंतर्गत आपली बँक अनेक किरकोळ कर्ज-योजना (Schematic Loans) तसेच लघु-उद्योजक व नव-उद्यमींसाठी ₹ १० कोटींपर्यंतची व्यावसायिक कर्जे वितरीत करते.

  अहवालवर्षी बँकेचा एकूण किरकोळ कर्ज-व्यवसाय ९.०४ टक्क्यांनी वाढून दि. ३१ मार्च, २०२१च्या ₹ ११,९९३.०७ कोटींवरुन दि. ३१ मार्च, २०२२ रोजी ₹ १३,०७७.७७ कोटींवर पोहोचला.

  आपली बँक मायक्रो फायनान्स व बचतगटांच्या माध्यमातूनही आर्थिक सहाय्य करते. आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये या योजनांतर्गत आपल्या बँकेने ₹ १४२.८४ कोटींची कर्जे वितरीत केली, जी गतवर्षीपेक्षा २१.६० टक्क्यांहून अधिक आहेत. अहवालवर्षी ५,००० हून अधिक बचतगट तर १,१०० हून अधिक वैयक्तिक कर्जदारांना मायक्रो फायनान्स अंतर्गत कर्जे वितरीत केली गेली. तसेच महिला आर्थिक विकास महामंडळाच्या (MAVIM) माध्यमातून ४,४०० बचतखाती अहवालवर्षी उघडण्यात आली.

अहवालवर्षी बँकेने प्राधान्य (Priority) क्षेत्रास ५१.९० टक्क्यांचा कर्जपुरवठा केला. एकूण ₹ १३,१३४ कोटींचा कर्ज-व्यवसाय प्राधान्य क्षेत्रास वितरीत करण्यात आला. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार एकूण कर्ज-व्यवसायाच्या ५० टक्के कर्जपुरवठा हा प्राधान्य क्षेत्रास करणे बंधनकारक आहे.

आपली बँक प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गतही गृहकर्जे वितरीत करते. आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये या योजनेद्वारे एकूण २,७८१ अर्ज ''नॅशनल हाऊसिंग बँकेकडे'' पाठविण्यात आले. त्यापैकी १,७८० अर्ज मंजूर झाले. या योजनेअंतर्गत अहवालवर्षी ₹ ३,७८१.८७ लाखांचे अनुदान (Subsidy) विविध गटांतील कर्जदारांस मिळाले.

- **किरकोळ ठेवी:**

  आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये कासा (CASA) ठेवींमध्ये ₹ १,०८५.८२ कोटींनी म्हणजेच ८.६९ टक्क्यांनी वाढ होऊन दि. ३१ मार्च, २०२१च्या ₹ १२,४९७.७६ कोटींवरुन कासा ठेवी दि. ३१ मार्च, २०२२ रोजी ₹ १३,५८३.५८ कोटींवर पोहोचल्या. कासा ठेवींचे एकूण ठेवींशी असलेले प्रमाणही गतवर्षीच्या ३०.५९ टक्क्यांवरून अहवालवर्षी ३१.६९ टक्क्यांवर पोहोचले.

- **सोसायटी कनेक्ट सुविधा:**

  अहवालवर्षी सहकारी गृहनिर्माण संस्थांकरिता आपल्या बँकेने 'सारस्वत बँक सोसायटी कनेक्ट' सुविधा अंमलात आणली. या सुविधेअंतर्गत सोसायटी व्हॅल्यू, सोसायटी प्लस व सोसायटी प्राईम असे तीन पर्याय उपलब्ध करण्यात आले. सहकारी गृहनिर्माण संस्था तसेच व्यावसायिक व निवासी संकुल हे त्यांचे देखभाल शुल्क संकलन (Collection of Maintenance Charges), इतर खर्च व संस्थेचा ताळेबंद या बाबींचे व्यवस्थापन या सुविधेअंतर्गत करु शकतात. ही सुविधा सध्या विनामुल्य उपलब्ध करण्यात आलेली असून त्याचे प्रात्यक्षिक मुंबईतील ३००हून अधिक गृहनिर्माण संस्थांना दाखविण्यात आलेले आहे.

बँकेच्या किरकोळ व्यवसायाला चालना देण्यासाठी गेल्या काही वर्षांत अनेक उपक्रम राबविले गेले.

- **बिझनेस डेव्हलपमेंट ऑफिसर्स (Business Development Officers - BDO):**

  जुलै, २०१९ मध्ये बँकेच्या किरकोळ योजनांच्या विपणनासाठी (Sales) एक स्वतंत्र टीम स्थापन करण्यात आली. या टीममध्ये 'बिझनेस डेव्हलपमेंट ऑफिसर्स' ची नियुक्ती करण्यात आली. या टीमला बँकेच्या विविध सेवा व योजनांचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. टॅब्लेट (Tablet) सारख्या अद्ययावत उपकरणांद्वारे ही टीम ग्राहकांना विविध सेवा प्रदान करते. टॅब्लेटद्वारे ग्राहकांचे तात्काळ खातेही सुरु करुन देण्यात येते.

  आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये १०५ 'बिझनेस डेव्हलपमेंट ऑफिसर्स' ची नियुक्ती करण्यात आली होती. त्यावेळी केवळ ९ महिन्यांत या टीमने

₹ ४३० कोटींचा व्यवसाय बँकेस मिळवून दिला होता. आज आपल्या बँकेत १२६ 'बिझनेस डेव्हलपमेंट ऑफिसर्स' विविध शाखांमधून सेवा देत आहेत व ही संकल्पना आता आपल्या बँकेत यशस्वीरित्या कार्यरत आहे. या टीमने आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये ₹ १,१०० कोटींचा व्यवसाय बँकेस मिळवून दिला आहे. याशिवाय, पहिल्या वर्षी या टीमने विमा व्यवसायात ₹ ११ कोटींचा विमा हप्ता जमा केला होता, तो दुसऱ्या वर्षी म्हणजेच अहवालवर्षी दुपटीवर नेला. अशाप्रकारे ''बिझनेस डेव्हलपमेंट ऑफिसर्स'' नी बँकेच्या किरकोळ व घाऊक व्यवसायवाढीस चालना देऊन बँकेच्या व्यवसायवृद्धीत भर घातली. बँकेच्या सर्वांगीण व्यवसायवाढीसाठी भविष्यात 'बिझनेस डेव्हलपमेंट ऑफिसर्स' ची संख्या अजूनही वाढविण्यात येईल.

- **ब्रँच सेल्स ऑफिसर्स (Branch Sales Officers - BSO):**

  आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये ब्रँच सेल्स ऑफिसर्स (BSO) ही संकल्पना सुरु करण्यात आली. या संकल्पनेअंतर्गत ग्राहकसेवेच्या गुणात्मक पैलूंवर लक्ष देण्यात आले. याशिवाय बँकेत येणाऱ्या नव-ग्राहकांना (Walk-in Customer) त्यांच्या गरजेनुसार सेवा सुविधा प्रदान करणे तसेच विद्यमान ग्राहकांकडून अतिरिक्त नवा व्यवसाय मिळविणे, हे ब्रँच सेल्स ऑफिसर्सचे लक्ष्य असेल. ब्रँच सेल्स ऑफिसर ही संकल्पना टप्प्याटप्प्याने कार्यान्वित होऊन अहवालवर्षी १०१ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. या संकल्पनेची व्याप्ती आगामी वर्षात अजून वाढविण्यात येईल. बँकेच्या या नव्या मोहीमेच्या परिणामी आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये ₹ ६९ कोटींनी कर्ज-व्यवसायात भर पडली तर ४,००० नवीन कासा खाती उघडण्यात आली.

- **कस्टमर रिलेशन्स अँड एक्सपिरिअन्स (Customer Relations & Experience):**

  'कस्टमर रिलेशन्स अँड एक्सपिरिअन्स' विभाग हा प्रामुख्याने ग्राहकांच्या शंका व तक्रारींचे निराकरण करतो. तसेच ग्राहकांशी संवाद साधून व्यवसायाच्या नवीन संधी उपलब्ध करतो. आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये या विभागाच्या माध्यमातून २.१९ लाख ग्राहकांशी संवाद साधण्यात आला. याद्वारे सुमारे १८,००० व्यवसायाच्या संधी (Business Leads) उपलब्ध झाल्या. याशिवाय ग्राहकांचे १.७९ लाख इन्कमिंग (Incoming) कॉल्सही हाताळण्यात आले. ग्राहकांच्या ७,४०० ई-मेल्सना उत्तरे देण्यात आली तर १,५०० कॉल्स 'ऑपरेशन स्पर्श' अंतर्गत स्वीकारण्यात आले. बँकेच्या शाखांमधून ग्राहकांशी संवाद साधण्याकरिता ५३ शाखांचे स्थापना दिवस साजरे करण्यात आले. यावेळी त्या-त्या परिमंडळांच्या प्रमुखांसह ग्राहकांशी संवाद साधण्यात आला.

- **डिपॉझिटर एंगेजमेंट सेल (Depositor Engagement Cell):**

  आपल्या बँकेत नियमित मुदत-ठेवींची गुंतवणूक करणाऱ्या ठेवीदारांची संख्या

मोठी आहे. त्यांचा सातत्यपूर्ण पाठींबा बँकेस अनेक वर्षे लाभलेला आहे. अशा ठेवीदारांबरोबर सतत संपर्कात राहण्याच्या उद्देशाने आपल्या बँकेने डिपॉझिटर एंगेजमेंट सेल स्थापन केलेला आहे. हा विभाग मुदत-ठेवीदारांशी कायम संपर्कात राहून त्यांच्या गरजेप्रमाणे विविध सुविधा प्रदान करेल.

**इतर आस्थापनांच्या उत्पादनांचे विपणन:**

- **विमा योजना:**

  आपली बँक विविध खाजगी विमा कंपन्यांच्या सहकार्याने अनेक प्रकारच्या विमा-योजनांचे विपणन करते. यामध्ये प्रामुख्याने आयुर्विमा, सामान्य **(General)** विमा, आरोग्य विमा तसेच सरकारी विमा योजना उदा. प्रधान मंत्री विमा योजना व प्रधान मंत्री जीवन ज्योती विमा योजना यांचे विपणन करते.

  आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये बँकेने इतर आस्थापनांच्या विमा व्यवसायातून ₹ १४९.६० कोटींचा विमा हप्ता जमा केला व एकूण ₹ २७.०६ कोटींचे उत्पन्न मिळविले.

- **म्युच्युअल फंड:**

  आपली बँक एचडीएफसी म्युच्युअल फंड, एलआयसी म्युच्युअल फंड, एल अँड टी म्युच्युअल फंड, निप्पॉन इंडिया म्युच्युअल फंड, आदित्य बिर्ला म्युच्युअल फंड, आयसीआयसीआय प्रुडेन्शियल म्युच्युअल फंड व एसबीआय म्युच्युअल फंड या आस्थापनांच्या म्युच्युअल फंड योजनांचे विपणन करते. अहवालवर्षी एकूण ₹ ६८.५७ कोटींचा म्युच्युअल फंड व्यवसाय आपल्या बँकेने केला, तर म्युच्युअल फंडाची एकूण एयुएम (AUM) ₹ ३६३.६० कोटी इतकी होती. अहवालवर्षी या व्यवसायातून ₹ १.८५ कोटींचे उत्पन्न मिळाले.

- **डिमॅट:**

  डिमॅट व्यवहारांकरिता आपली बँक एनएसडीएल (NSDL) व सीडीएसएल (CDSL) या दोन्ही संस्थांशी संलग्न आहे. अहवालवर्षी डिमॅट व्यवहारांद्वारे ₹ ४.२८ कोटींचे उत्पन्न मिळाले. यापैकी ₹ १.०७ कोटींचे उत्पन्न मे. रेलिगेअर सेक्युरिटीज लिमिटेड व मे. एक्सिस सेक्युरिटीज लिमिटेडद्वारे उपलब्ध केलेल्या ऑनलाईन ब्रोकिंग सुविधेमुळे प्राप्त झाले. अहवालवर्षी १,०१९ नवीन ट्रेडिंग खाती उघडण्यात आली.

**क्रेडिट कार्ड:**

नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI)च्या सहकार्याने आपली बँक रुपे प्लॅटिनम क्रेडिट कार्ड वितरित करते. याशिवाय बँक, ग्राहकांना त्यांच्या मुदत ठेवीच्या आधारे कुठलेही शुल्क न आकारता 'Secured Credit Card' सुद्धा वितरीत करते. दि. ३१ मार्च, २०२२ रोजी बँकेने एकूण ३८,००० कार्ड्स् वितरीत केली असून त्यामधील एकूण व्यवहार हे ₹ ४०.६३ कोटींचे होते.

क्रेडिट कार्ड व्यवसायातून आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये बँकेस गतवर्षीच्या ₹ ६.०४ कोटींच्या तुलनेत ₹ ८.७८ कोटी इतके उत्पन्न मिळाले.

**(ii) घाऊक बँकिंग व्यवसाय:**

घाऊक बँकिंग व्यवसायास चालना देण्यासाठी वर्षभरात अनेक संकल्पना राबविण्यात आल्या. ऑगस्ट, २०२१ मध्ये घाऊक बँकिंग विभाग

व या विभागाशी संबंधित असलेले इतर विभाग यामध्ये समन्वय वाढावा याकरिता 'Wholesale Banking Conclave'चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बँकेच्या घाऊक व्यवसायवृद्धीकरिता खाली नमूद केल्याप्रमाणे काही निर्णय घेण्यात आले.

- 'Wholesale Banking Credit' समितिची (WBCC) कर्ज-मंजुरीची मर्यादा ₹ २० कोटींवरुन ₹ ३० कोटींवर नेण्यात आली. अहवालवर्षात आपल्या बँकेने मिड-कॉर्पोरेट व एसएमई क्षेत्रात प्रत्येकी ₹ ३० ते ₹ ४० कोटींचे कर्ज-खाते मिळविण्याचे लक्ष्य ठरविले होते. त्याकरिता ही मर्यादा वाढविण्यात आली.
- 'Wholesale Banking Credit' समितीची (WBCC) बैठक दररोज आयोजित करण्यात आली जेणेकरुन कर्ज-मंजुरीचा वेळ कमी झाला.
- नवीन कर्ज-व्यवहारांस गती देण्यासाठी 'Structured Teaser' यंत्रणेची स्थापना करण्यात आली.
- या एकत्रित प्रयत्नांच्या परिणामी सुमारे ७० नवीन कर्ज-खाती आपल्या बँकेस मिळाली व याद्वारे ₹ १,२९५ कोटींच्या घाऊक बँकिंग व्यवसायाची भर पडली.
- क्रेडिट ॲडमिनिस्ट्रेशन विभागाशी (Credit Administration Department) सुरळीत समन्वय साधण्याकरिता प्रत्येक एसएमई शाखेत 'Single Point of Contact' (SPOC)ची नेमणूक करण्यात आली. त्याचप्रमाणे, घाऊक बँकिंग विभाग हा कर्ज-वितरणाकरिता एसएमई शाखा, क्रेडिट ॲडमिनिस्ट्रेशन विभाग व विधी (Legal) विभाग यांच्यात समन्वयकाची भूमिका निभावेल असे ठरविण्यात आले.
- आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये ₹ ४,४०० कोटींची व्यावसायिक कर्जे मंजूर करण्यात आली (गतवर्षी ₹ ३,१४० कोटी) व ₹ २,९०० कोटींची कर्जे वितरीत (गतवर्षी ₹ २,१५५ कोटी) करण्यात आली. उर्वरित ₹ १,५०० कोटींची कर्जे चालू वर्षात वितरीत होतील.
- वर नमूद केलेल्या ₹ ४,४०० कोटींच्या कर्जांपैकी २४ टक्के म्हणजेच ₹ १,०७० कोटींची कर्जे ही सरकारच्या इमर्जन्सी क्रेडिट लाईन गॅरेंटी योजने अंतर्गत (ECLGS) पात्र कर्जदारांना मंजूर करण्यात आली व त्यापैकी ७५ टक्के कर्जे वितरीतही करण्यात आली.

वरील सर्व निर्णयांच्या एकत्रित परिणामांमुळे घाऊक कर्जव्यवसायामध्ये गतवर्षीच्या तुलनेत १०.०३ टक्क्यांची म्हणजेच ₹ १,२७२ कोटींची वाढ होऊन दि. ३१ मार्च, २०२२ अखेरीस तो ₹ १३,९५८ कोटींवर पोहोचला. यामध्ये प्रामुख्याने इंजिनियरिंग, केमिकल व केमिकल उत्पादने, फूड प्रोसेसिंग, टेक्स्टाईल, पेपर आणि पॅकेजिंग, ऑटो, लोखंड आणि पोलाद व उर्जा यासारख्या उद्योगांचा समावेश आहे.

एक लक्षणीय बाब म्हणजे अहवालवर्षात सर्व उद्योग हे आर्थिक अडचणींचा सामना करीत असतानाही बँकेच्या घाऊक कर्ज-व्यवसायाच्या अनुत्पादित कर्जांत फारशी वाढ झाली नाही.

अहवालवर्षात २९ घाऊक कर्ज-खात्यांची पुनर्रचना करण्यात आली. या खात्यांची एकूण कर्ज-मर्यादा ₹ ६८४.३० कोटी आहे. या सर्व खात्यांचे नियमित निरीक्षण केले जात आहे. किंबहुना, आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीत आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाल्यानंतर यापैकी ९ खात्यांनी त्यांची देय रक्कम अदा केली आहे व त्यासाठी बँकेने केलेली ₹ ३१.२७ कोटींची तरतूदही पुन्हा नफ्यात जमा करण्यात आलेली आहे.

**(iii) विदेश विनिमय व्यवसाय:**

आपल्या बँकेकडे विदेश विनिमय व्यवसायाचा परवाना वर्ष १९७९ पासून आहे. आपली बँक नऊ फॉरेक्स सेंटर्सच्या माध्यमातून विदेश विनिमय सेवा उपलब्ध करुन देते. व्यावसायिक ग्राहकांच्या व्यापार वित्तविषयक गरजा व किरकोळ ग्राहकांच्या विदेशी चलनाच्या गरजा ह्या फॉरेक्स सेंटर्सद्वारे हाताळल्या जातात. आपल्या बँकेतून ग्राहकांना सर्व प्रकारच्या प्रमुख विदेश विनिमय सेवांचा लाभ घेता येतो.

अहवालवर्षी, आपल्या बँकेचा ग्राहकांशी करण्यात आलेला विदेश विनिमय व्यवसाय ₹ ३७,९२२.५५ कोटी इतका होता तर निर्यातीकरिता वितरीत केलेली कर्जे ही ₹ १,५२४.५५ कोटी इतकी होती.

आपली बँक दहा महत्त्वाच्या विदेशी चलनांमध्ये व्यवहार करते. जगातील अनेक बँकांबरोबर व्यावहारिक संबंधही (Correspondent Relations) आपल्या बँकेने प्रस्थापित केलेले आहेत. याव्यतिरिक्त आपली बँक, अकरा सहकारी बँकांनाही विदेश विनिमय सेवा उपलब्ध करुन देत आहे.

**(iv) कोषागार विभाग:**

आपल्या बँकेचा कोषागार विभाग रोख राखीवता प्रमाण (Cash Reserve Ratio - CRR) व वैधानिक तरलता प्रमाण (Statutory Liquidity Ratio - SLR) या दोन निकषांचे व्यवस्थापन करतो. याशिवाय, दैनंदिन निधी व्यवस्थापनाची (Funds Management) जबाबदारीही पार पाडतो. विदेश विनिमय व्यवहारांकरिताही आपला कोषागार विभाग शाखांना सहाय्य करतो.

रोखे व्यवहारांमध्ये आपला कोषागार विभाग सक्रीयपणे कार्यरत असून बँकेच्या नफ्यात भर घालत असतो. अहवालवर्षी पहिल्या सहामाहीत रोख्यांवरील व्याजदर हे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सौम्य पतधोरणामुळे व बाजारातील अतिरिक्त तरलतेमुळे बऱ्याच अंशी स्थिर राहिले. परंतु, दुसऱ्या सहामाहीत जागतिक चलनवाढ, अमेरिकन व्याजदरातील वाढ, फेडरल रिझर्व्ह बँकेकडून मवाळ पतधोरण गुंडाळण्याचे संकेत, भारतातील चलनवाढ इत्यादी बाबींमुळे व्याजदरात वाढ झाली.

वाढत्या व्याजदराच्या पार्श्वभूमीवर कोषागार विभागाने व्याजाद्वारे मिळणारे उत्पन्न वाढविण्यावर भर दिला. तसेच दुसऱ्या बाजूस गुंतवणुकीवरील तरतूद (Depreciation) कमी राखण्यासही प्राधान्य दिले. याकरिता अल्प मुदतीच्या रोख्यांमध्ये गुंतवणूक करण्यात आली. रोखे बाजारातील दैनंदिन व्याजदरातील चढ-उतारामध्ये व्यवहार (Trading) करुन कोषागार विभागाने नफाही मिळविला. यापुढील काळात व्याजाचे दर चढे राहील्यास, आपला कोषागार विभाग व्याजाद्वारे अधिक उत्पन्न देणाऱ्या रोख्यांमध्ये गुंतवणूक करण्याचे धोरण अवलंबेल.

## ४. डिजिटल बँकिंग विभाग

सध्याच्या काळात ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणावर डिजिटल पेमेंट पद्धतीचा अवलंब होत आहे. यामुळे डिजिटल व्यवहारांमध्येही वाढ झालेली आहे. आपली बँक टॅब बँकिंग, व्हॉट्सअॅप बँकिंग, मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग, UPI, NETC, गिफ्ट कार्ड्स अशा अनेक प्रकारच्या डिजिटल सुविधा प्रदान करते. बँकेच्या एकूण व्यवहारांपैकी ८० टक्यांहून जास्त व्यवहार हे डिजिटल माध्यमातून होतात. यामध्ये UPI व्यवहारांचा मोठा वाटा आहे. जवळपास ७० टक्के व्यवहार हे UPI माध्यमांद्वारे केले जातात.

प्रत्येक नवीन ग्राहक किमान एकातरी डिजिटल सेवेसाठी नोंदणी करेल हे खाते उघडतानाच निश्चित केले जाते. अहवालवर्षी बँकेशी जोडलेल्या नवीन ग्राहकांपैकी ७३ टक्के ग्राहकांनी किमान एका डिजिटल सुविधेची नोंदणी केलेली आहे. तसेच, अहवालवर्षी उघडण्यात आलेल्या नवीन खात्यांमध्ये ४३ टक्के खाती ही 'बँक ऑन टॅब' या अॅपद्वारे उघडण्यात आलेली आहेत. याशिवाय बँकेने अहवालवर्षी ६५,००० गिफ्ट कार्ड्स तर १,३०० Point of Sale (POS) मशीन्स वितरीत केल्या. बँकेने आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये आपला इंटरनेट बँकिंग प्लॅटफॉर्मही बदलून Finacle E-Banking Platform (FEBA) वर स्थलांतरीत केला. FEBA ही एक सुरक्षित व कार्यक्षम इंटरनेट बँकिंग प्रणाली आहे.

## ५. अॅडव्हर्टायझिंग, अलायन्स अॅण्ड कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स

आपल्या बँकेकडे योग्य प्रकारे आपल्या ब्रँडचे व उत्पादनांचे मार्केटिंग योग्य वेळी लोकांपर्यंत पोहोचविण्याकरिता 'अॅडव्हर्टायझिंग, अलायन्स अॅण्ड कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स' विभाग कार्यरत आहे. अहवालवर्षी आपल्या बँकेच्या जाहिराती या ग्राहकांच्या बँकिंगविषयक गरजा, बँकेच्या शाखांची भौगोलिक स्थाने, तसेच ग्राहकांचा कल कुठल्या बँकिंग उत्पादनावर जास्त आहे या गोष्टी विचारात घेऊन आखण्यात आल्या.

आपल्या बँकेचे उद्दीष्ट हे अनेक प्रकारच्या माध्यमाद्वारे (Multi-media) जास्तीत-जास्त ग्राहकांपर्यंत पोहोचणे हे आहे. यामध्ये प्रिंट, रेडियो, डिजिटल, आउट-डोअर व दूरचित्रवाणी यांचा समावेश आहे. अहवालवर्षी, ओटीटी (OTT) प्लॅटफॉर्मवर इन-शो ब्रँड (In-show Brand), प्रॉडक्ट प्लेसमेंट (Product Placement) व प्रादेशिक न्यूज चॅनेलमध्ये एल-बॅण्ड (L-Band), अॅस्टन बॅण्ड (Aston Band) द्वारेही आपल्या बँकेच्या जाहिराती प्रदर्शित केल्या गेल्या.

ऑनलाईन मिडियात फेसबूक, इन्स्टाग्राम, ट्विटर, लिंक्डइन व युट्युब या माध्यमांवरही बँकेची उपस्थिती आहे.

अहवालवर्षी 'सकाळ मिडिया' समुहाने केलेल्या एका सर्वेक्षणामध्ये महाराष्ट्रातील टॉप ६१ ब्रॅण्ड्समध्ये आपल्या बँकेचा समावेश केला होता. यामध्ये बँकेचा गेल्या १०० वर्षातला प्रवास व व्यवसायातील यशस्वी वाढ दर्शविण्यात आली होती. भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रात आपल्या बँकेवर एक लेख प्रकाशित करण्यात आला होता. या लेखात बँकेचा आजपर्यंतचा प्रवास व आधुनिक भारताच्या उभारणीतील बँकेची भूमिका यावर प्रकाश टाकण्यात आला होता.

अहवालवर्षी आपल्या बँकेच्या कॉर्पोरेट वेबसाईटचे स्वरुपही बदलण्यात आले व नवनवीन ब्लॉग्ज, व्हिडियोज, अॅनिमेशनद्वारा वापरकर्त्यांसाठी ती अजून सुलभ करण्यात आली. आपल्या बँकेच्या वेबसाईटला भेट देणाऱ्या अभ्यागतांमध्येही अहवालवर्षी लक्षणीय वाढ झाली.

## ६. इन्फॉर्मेशन सिक्युरिटी (Information Security)

आपल्या बँकेने गेल्या काही काळात आपली माहिती व सायबर सुरक्षा मजबूत केलेली आहे. चीफ इन्फॉर्मेशन सिक्युरिटी ऑफिसर (CISO)च्या अधिपत्याखाली आपला इन्फॉर्मेशन सिक्युरिटी विभाग बँकेच्या संपूर्ण व्यवसायाची सायबर सुरक्षा सांभाळतो. इन्फॉर्मेशन सिक्युरिटी विभाग सायबर सुरक्षिततेचे उपाय प्रस्तावित करण्याबरोबरच त्या विषयातील तज्ज्ञांकडून या उपायांचे काटेकोर पालन होत आहे याची खात्री करीत असतो. यामुळे बँकेच्या डिजिटल व नॉन-डिजिटल उत्पादनांच्या सायबर सुरक्षेचे सक्षमीकरण होत असते.

हा विभाग सायबर सुरक्षिततेविषयी, कर्मचारी व ग्राहकांमध्येही जागरुकता निर्माण करतो. कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाद्वारे तर ग्राहकांना सोशल मिडिया / एसएमएस / ई-मेलद्वारे याबद्दल वेळोवेळी माहिती दिली जाते. आपल्या बँकेच्या वेबसाईटवर ‘सतर्क बँकिंग’ हे वेबपेज तयार करण्यात आले आहे. या पेजद्वारे सायबर गुन्ह्यांची माहिती व त्यावरील प्रतिबंधक उपाय सार्वजनिकरित्या उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. याशिवाय इन्फॉर्मेशन सिक्युरिटी विभाग हा अनेक प्रकारची सायबर ड्रील्स आयोजित करुन सायबर सुरक्षेची वेळोवेळी चाचपणी करीत असतो.

## ७. अनुत्पादित कर्जे

आपल्या बँकेच्या वसुली विभागाने अहवालवर्षात अनुत्पादित कर्जाच्या वसुलीसाठी विविध उपायांची आखणी केली. याद्वारे अनुत्पादित कर्जाच्या वसुलीसाठी कर्जांची पुनर्रचना (Restructuring), तडजोडीने सहमती (Compromise Settlement), परस्पर संमतीने ताब्यात घेतलेल्या मालमत्तांची विक्री इत्यादी पर्याय वापरण्यात आले. विशेष वसुली अधिकाऱ्यांनी किरकोळ अनुत्पादित कर्जाच्या वसुलीवरही भर दिला, तसेच या कर्जदारांशी सतत संपर्कात राहून किरकोळ कर्जांत वाढ होणार नाही हे निश्चित केले.

अहवालवर्षी आपल्या बँकेने अनुत्पादित कर्जाच्या वसुलीत चांगली कामगिरी बजावली. आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये एकूण ढोबळ अनुत्पादित कर्जे ₹ १,२००.५८ कोटींवरुन ₹ १,१०६.६२ कोटींपर्यंत कमी झाली. ढोबळ अनुत्पादित कर्जांचे प्रमाणही गतवर्षीच्या ४.५८ टक्क्यांवरुन सुधारुन दि. ३१ मार्च, २०२२ रोजी ३.८६ टक्क्यांवर आले तर निव्वळ अनुत्पादित कर्जांचे प्रमाण १.०४ टक्क्यांवरुन कमी होऊन ०.६५ टक्क्यांवर आले.

जलद वसुली ही बँकेचा नफा वाढवत असते. त्यामुळे वसुलीच्या उपाययोजना या पद्धतशीरपणे आखलेल्या असणे आवश्यक आहे. याकरिताच पुढील आर्थिक वर्षात आपल्या बँकेने अनुत्पादित कर्जाच्या वसुलीसाठी तीन वेगवेगळे विभाग करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये घाऊक (Wholesale), किरकोळ (Retail) व निष्कासित (Prudentially Written-off) असे अनुत्पादित कर्जाच्या वसुलीसाठी तीन गट असतील.

### निष्कासित (Write-Off) कर्जांची वसुली:

आपल्या बँकेने निष्कासित केलेल्या कर्ज-खात्यांमधून गतवर्षीच्या ₹ ५.२८ कोटींच्या तुलनेत अहवालवर्षी ₹ ३९.६४ कोटींची वसुली केली. या खात्यांमध्ये कुठलेही तारण नसल्यामुळे वसुलीची शक्यता नगण्य असतानाही बँकेने प्रयत्नपूर्वक ही रक्कम वसूल केली. निष्कासित कर्जांच्या वसुलीची रक्कम ही बँकेच्या नफ्यात थेट भर घालत असते.

### प्रोव्हिजन कव्हरेज प्रमाण:

अनुत्पादित कर्जांवरील तरतुदीकरिता आपली बँक आयआरएसी (IRAC) च्या निकषांचे काटेकोरपणे पालन करते. हे निकष पाळून आवश्यक प्रमाणापेक्षा

अधिक तरतूदही करते. अहवालवर्षी आपल्या बँकेने ₹ १८४.२० कोटींची अतिरिक्त तरतूद केलेली आहे. यामुळे, अनुत्पादित कर्जांकरिता केलेल्या तरतुदीचे प्रमाण म्हणजेच प्रोव्हिजन कव्हरेज प्रमाण (Provision Coverage Ratio) हे दि. ३१ मार्च, २०२२ रोजी ८०.५५ टक्क्यांवर पोहोचले. गतवर्षी हेच प्रमाण ७४.८४ टक्के इतके होते. प्रोव्हिजन कव्हरेजचे सुदृढ प्रमाण हे अनुत्पादित कर्जांसाठी भक्कम तरतूद केल्याचे दर्शविते.

## ८. भांडवल पर्याप्तता (CRAR)

बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण हे दि. ३१ मार्च, २०२२ रोजी १३.९४ टक्के इतके आहे, जे ९ टक्के या आवश्यक निकषापेक्षा अधिक आहे.

## ९. नफा-वितरण

आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये आपल्या बँकेच्या निव्वळ नफ्यामधून खालीलप्रमाणे तरतूद करण्याची शिफारस संचालक मंडळाने केलेली आहे:

तक्ता क्र. १ (₹ लाखांत)

| | २०२१-२२ | २०२०-२१ |
|---|---|---|
| राखीव निधी (२५%) | ६,८७५.५६ | ६,७५६.१२ |
| आकस्मिकता निधी (१०%) | २,७५०.२२ | २,७०२.४५ |
| शैक्षणिक निधी (१%) | २७५.०३ | २७०.२५ |
| प्रस्तावित लाभांश १०.५०% (प्रेफरन्स समभाग) | ५७१.६६ | ५७१.६६ |
| प्रस्तावित लाभांश २०% (इक्विटी समभाग) | ५०८८.५० | ४,६७०.०० |
| कर्मचाऱ्यांसाठी सानुग्रह अनुदान १५% | ३,३४०.०० | ४,५३६.०० |
| सभासद कल्याण निधी | ५०.०० | ५०.०० |
| कर्मचारी कल्याण निधी | १०.०० | १०.०० |
| सार्वजनिक, धर्मादाय व सहकारी कार्यासाठी निधी (१%) | २७५.०३ | २७०.२५ |
| गुंतवणूकविषयक जोखीम निधी | ५,०००.०० | ५,०००.०० |
| विशेष राखीव निधी | १,८००.०० | २,०००.०० |
| सर्वसाधारण राखीव निधी | १,५००.०० | १८५.०० |
| पुढील वर्षाकरीता शिल्लक | ८६.९३ | १२०.६९ |
| **एकूण** | **२७,६२२.९३** | **२७,१४२.४२** |

### इक्विटी समभाग लाभांश:

दि. ३१ मार्च, २०१९ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाकरिता आपल्या बँकेने १७.५० टक्के इतका लाभांश इक्विटी भागधारकांना दिला होता. आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रक क्र. RBI/२०१९-२०/२१८ दि. १७ एप्रिल, २०२० नुसार कोव्हिड-१९च्या पार्श्वभूमीवर बँकांना त्यांच्या नफ्यामधून लाभांश न देण्याची सूचना दिली होती. यानुसार, आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये इक्विटी भागधारकांना लाभांश दिला गेला नाही. यामुळे दि. ३१ मार्च, २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाकरिता आपल्या बँकेने २० टक्के म्हणजेच मागील लाभांशापेक्षा २.५० टक्के अधिक लाभांश दिला होता.

दि. ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाकरिताही सर्वसाधारण सभेने मंजुरी दिल्यास, इक्विटी भागधारकांना २० टक्के, म्हणजेच आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये दिलेल्या लाभांशा इतकाच लाभांश देण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे.

### प्रेफरन्स समभाग लाभांश:

दि. ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाकरिता प्रेफरन्स भागधारकांना १०.५० टक्के लाभांश देण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे.

### सभासद कल्याण निधी:

सभासद कल्याण निधीकरिता ₹ ५०.०० लाख वर्ग करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे. हा निधी जमेस धरून एकूण सभासद कल्याण निधी ₹ १,४२३.५० लाख इतका असेल. अहवालवर्षी एकूण ८९२ सभासदांनी वैद्यकीय मदतीचा लाभ घेतला, तसेच सभासदांच्या ११ गुणवंत पाल्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

### कर्मचाऱ्यांसाठी सानुग्रह अनुदान:

दि. ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाकरिता बँकेच्या कर्मचाऱ्यांना १५ टक्के सानुग्रह

अनुदान देण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे.

**सार्वजनिक धर्मादाय आणि सहकार क्षेत्राच्या कार्यासाठी निधी:**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रक क्र. UBD/(PCB)/BPD/Cir./४३ दि. ११ एप्रिल, २००५ नुसार परवानगी दिल्याप्रमाणे सामाजिक व धर्मादाय कार्याकरिता ₹ २७५.०३ लाख इतकी तरतूद करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे.

**विशेष राखीव निधी:**

प्राप्तिकर खात्याच्या तरतुदीनुसार विशेष राखीव निधीत ₹ १,८०० लाख वर्ग करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहेत.

## १०. बँकेच्या उपविधीमध्ये सुचविलेल्या दुरुस्त्या

- **उपविधी क्र. १ अ:**

  या उपविधीनुसार भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पूर्वपरवानगीने संपूर्ण भारत हे बँकेचे कार्यक्षेत्र आहे. यामध्ये कोणताही बदल करावयाचा असल्यास भारतीय रिझर्व्ह बँक व निबंधकांची परवानगी घेणे आवश्यक असेल असे नमूद करण्यात आलेले आहे.

  परंतु भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आर्थिक वर्ष २०२०-२१च्या लेखापरीक्षणात उपविधी क्र. १ अ हा सुस्पष्ट नसल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले.

  या पार्श्वभूमीवर भारतीय रिझर्व्ह बँकेने आपल्या बँकेस संपूर्ण भारत हे कार्यक्षेत्र असल्याचा परवाना दि. ४ जानेवारी, २०११ च्या पत्र क्र. UBD/MRO/BSS१/६४९०/१२.०७.२२८/२०१०-११ नुसार दिलेला आहे. या परवानगी प्रमाणे उपविधी क्र. १ अ मध्ये बदल करण्याचा प्रस्ताव मांडण्यात येत आहे.

- **उपविधी क्र. ५४:**

  सध्याच्या उपविधी क्र. ५४ मधील घटनादुरुस्ती (सत्याण्णव) २०११ नुसार संचालक मंडळावरील राखीव जागांसंदर्भात कोणतीही तरतूद नाही. याकरिता, घटनादुरुस्ती आणि माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या दि. २७ सप्टेंबर, २०२१च्या आदेशानुसार उपविधी क्र. ५४ मध्ये संचालक मंडळावरील राखीव जागांसंदर्भात (एक जागा SC / ST आणि दोन जागा महिलांसाठी) बदल करण्याचा प्रस्ताव मांडण्यात येत आहे. याशिवाय संचालक मंडळाची सदस्य संख्या किमान १९ वरुन २१ करण्याची तरतूदही याद्वारे करण्यात येत आहे.

- **उपविधी क्र. ५५:**

  या उपविधीतील परिच्छेद क्र. ३ मध्ये संचालक मंडळाच्या निवडणुकीकरिता उमेदवारीचे निकष नमूद करण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त, उपविधी क्र. ५५ अ मध्येही संचालकपदाच्या निवडणुकीकरिता उमेदवारीचे इतर निकष नमूद करण्यात आले आहेत. या अनुषंगाने, सध्याच्या उपविधी क्र. ५५च्या परिच्छेद क्र. ३ मध्ये नमूद केलेला मजकूर काढून टाकून उपविधी क्र. ५५ अ मध्ये अंतर्भूत करण्यासाठी प्रस्ताव मांडण्यात येत आहे.

  याशिवाय बँकेच्या उपविधी क्र. ५५ मध्ये संचालकपदाच्या १६ जागांकरिता उमेदवारांच्या विभागवार नामांकनासंदर्भात नमूद करण्यात आले आहे. संचालक मंडळावर तीन राखीव जागा (एक जागा SC / ST आणि दोन जागा महिलांसाठी) वाढल्यामुळे या तीन जागांच्या विभागवार नामांकनासाठी उपविधीत तरतूद करणे आवश्यक आहे. यामुळे बँकेच्या उपविधी क्र. ५५ मध्ये परिच्छेद क्र. ४ (महिलांसाठी दोन राखीव जागा) व परिच्छेद क्र. ५ (SC / ST

करिता एक राखीव जागा) समाविष्ट करण्याचा प्रस्ताव मांडण्यात येत आहे.

- **उपविधी क्र. ५५ अ:**

  उपविधी क्र. ५५ मध्ये संचालक पदाच्या निवडणुकीतील उमेदवारीकरिता किमान ५० समभाग उमेदवाराकडे असणे तसेच सभासद हा बँकेचा कर्जदार (ठेवी तारण ठेवून कर्ज घेतले असल्यास सोडून) नसणे बंधनकारक आहे, असे नमूद केलेले आहे. उपविधी क्र. ५५ व ५५ अ या दोन्ही उपविधींमध्ये संचालकपदाच्या निवडणुकीकरिता उमेदवारांचे निकष नमूद केलेले असल्यामुळे उपविधी क्र. ५५ मधील परिच्छेद हा उपविधी क्र. ५५ अ मध्ये अंतर्भूत करण्यासाठी प्रस्ताव मांडण्यात येत आहे.

- **उपविधी क्र. ६३ (c):**

  उपविधी क्र. ६३ (c) नुसार, बँकेच्या संचालक मंडळातील सदस्य संचालक मंडळात असेपर्यंत, स्वतःच्या ठेवी तारण ठेवून घेतलेले कर्ज सोडल्यास संस्थेकडून कुठल्याही प्रकारचे कर्ज घेऊ शकत नाही. तसेच एखाद्या कर्जासाठी संचालकाने हमी दिली असल्यास त्या कर्जाच्या मंजुरी प्रक्रियेत सहभागी होऊ शकत नाही.

  परंतु, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आर्थिक वर्ष २०२०-२१च्या लेखापरीक्षणात हा उपविधी सुस्पष्ट नसल्याचे नमूद करण्यात आले. या अनुषंगाने उपविधी क्र. ६३ (c) मध्ये बदल सुचविण्यात येत आहेत.

  वरील सर्व उपविधी दुरुस्त्यांचा अचूक मजकूर वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांना देण्यात येईल.

## ११. बँकेला मिळालेले पुरस्कार

आपल्या बँकेला नामांकित संस्थांकडून खालील पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

- **इंडियन बँक्स असोसिएशन:**
  - ✓ सलग सहाव्या वर्षी 'बेस्ट टेक्नॉलॉजी बँक ऑफ द इयर' पुरस्कार.
  - ✓ सलग दुसऱ्या वर्षी 'बेस्ट आयटी रिस्क अँड सायबर सिक्युरिटी इनिशिएटिव्ह' पुरस्कार.
  - ✓ विशेष श्रेणी अंतर्गत 'बेस्ट Cloud Adoption' पुरस्कार.
- सायबर सुरक्षा जागरुकतेसाठी ज्युरी विशेष श्रेणीअंतर्गत DSCI Excellence पुरस्कार २०२१.
- 'फोर्ब्स' या प्रतिष्ठित अमेरिकन बिझनेस नियतकालिकाने केलेल्या सर्वेक्षणात जगातील सर्वोत्तम बँकांच्या यादीत सलग तिसऱ्या वर्षी आपल्या बँकेचा समावेश केलेले आहे. 'फोर्ब्स' हे व्यापार, तंत्रज्ञान व वित्तीय विषयांकरिता वाहून घेतलेले नियतकालिक आहे. 'फोर्ब्स' ने स्टॅटिस्टा या मार्केट रिसर्च संस्थेच्या सहकार्याने २३ देशांमध्ये हे सर्वेक्षण केले होते.

## १२. सामाजिक बांधिलकीचे उपक्रम

आपली बँक विविध सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमांद्वारे समाजाप्रती आपले योगदान देण्याचा प्रयत्न करीत असते. आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये आपल्या बँकेने सामाजिक बांधिलकीच्या दायित्वातून खालील उपक्रमांस सहाय्य केले:

- कोकण व पश्चिम महाराष्ट्राच्या काही भागांमध्ये पावसाळ्यात प्रचंड पूर आला. तसेच भूस्खलनाच्याही घटना घडल्या. रायगड, महाड, खेड, चिपळूण, संगमेश्वर, रत्नागिरी, कोल्हापूर, सांगली आणि साताऱ्याच्या अनेक भागांत पावसाने हाहाकार माजवला. मोठ्या प्रमाणात जिवीत व वित्त हानी झाली. राज्य सरकारने पूरग्रस्तांना आर्थिक व वैद्यकीय मदत

पुरविली. आपल्या बँकेने राज्याप्रति असलेल्या बांधिलकीच्या भावनेतून दि. २७ जुलै, २०२१ रोजी पूरग्रस्तांना आर्थिक मदत म्हणून मुख्यमंत्री सहाय्यता निधीत ₹ १ कोटीचा धनादेश महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धवजी ठाकरे यांना सुपूर्द केला.

- कोकणच्या विकासासाठी बँक सदैव पुढाकार घेते. अहवालवर्षी बँकेने मानव साधन विकास संस्था या धर्मादाय न्यासाला त्यांच्या नर्सिंग विद्यालयासाठी ₹ ५० लाखांचे आर्थिक सहाय्य केले. मानव साधन विकास संस्था (MSVS) ही कोकणातील दुर्गम भागांतील लोकांच्या विकासाकरिता गेली २५ वर्षे अविरतपणे कार्य करीत आहे. याशिवाय सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अणाव या गावी गेली दोन वर्षे नर्सिंग विद्यालय चालवित आहे. या विद्यालयासाठी बँकेने मदतीचा हात पुढे केला आहे.
- अहवालवर्षी कोव्हिड-१९ साथीच्या आजाराची दुसरी लाट आली. यावेळी रुग्णालयांमध्ये उपचाराकरिता लागणाऱ्या ऑक्सिजन सिलेंडर्स्‌ची कमतरता होती. यावेळी, सिंधुदुर्ग जिल्हाधिकाऱ्यांच्या आवाहनानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रुग्णालयांना बँकेतर्फे जंबो ऑक्सिजन सिलेंडर्स्‌ देणगीरुपात देण्यात आले.
- शैक्षणिक, वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रांत कार्य करणाऱ्या १९८ संस्थांना एकूण ₹ २५.७२ लाखांच्या देणग्या बँकेच्या 'ऋणानुबंध' उपक्रमाअंतर्गत अहवालवर्षी देण्यात आल्या.

## १३. इतर घडामोडी

- **एकनाथ ठाकूर स्मृती व्याख्यानमाला:** श्री एकनाथ ठाकूर यांचे दूरदर्शी नेतृत्व व बँकेप्रती त्यांनी दिलेल्या अतुलनीय योगदानाकरिता, तसेच त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता, आपली बँक दरवर्षी एकनाथ ठाकूर स्मृती व्याख्यानमाला आयोजित करते. ह्या व्याख्यानमालेची सुरुवात ही वर्ष २०१६ पासून करण्यात आली. या व्याख्यानमालेतील पाचवे व्याख्यान हे दि. १५ फेब्रुवारी, २०२२ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृह, मुंबई येथे आयोजित करण्यात आले होते. यावर्षी श्री. गिरीश कुबेर, संपादक - लोकसत्ता हे व्याख्याते होते. श्री. गिरीश कुबेर हे साहित्य व पत्रकारितेतील एक अग्रगण्य व्यक्तिमत्व आहे. त्यांनी 'बदलती जागतिक राजकीय परिस्थिती व त्यामुळे इंधन / उर्जा क्षेत्रात निर्माण होणारी आव्हाने' या विषयावर उपस्थितांना संबोधित केले.

- **प्रशासकीय कार्यालयाच्या इमारतीचा विस्तार:**

आपल्या बँकेच्या प्रशासकीय कार्यालयाची इमारत - 'एकनाथ ठाकूर भवन' ही सप्टेंबर, २०१० पासून प्रभादेवी येथे कार्यरत आहे. या इमारतीत बँकेचे घाऊक बँकिंग (Wholesale Banking), किरकोळ बँकिंग (Retail Banking) इत्यादी व्यवसाय-केंद्रीत विभाग तसेच विधी (Legal), जोखीम व्यवस्थापन (Risk Management), मानव संसाधन (HRD) इत्यादी प्रशासकीय विभागांचे कार्य चालते. हे सर्व विभाग एकत्रित असण्याचा आपल्या बँकेस लाभ होऊन गेल्या दशकांत बँकेचा व्यवसाय ₹ २३,५०० कोटींवरुन ₹ ७१,५०० कोटींवर पोहोचला.

बँकेच्या आगामी शाखा-विस्ताराद्वारे वाढणाऱ्या नवीन व्यवसायाचा विचार करता बँकेचे उच्चाधिकारी तसेच खाली नमूद केलेले काही महत्त्वाचे विभाग हे प्रशासकीय कार्यालयाच्या इमारतीत एकाच छत्राखाली असणे आवश्यक

आहे. यामुळे, सर्व विभागांत उत्तम समन्वय राहून कार्यक्षमतेतही वाढ होईल.

१) माहिती-तंत्रज्ञान विभाग (Information Technology Department)

२) डिजिटल बँकिंग विभाग (Digital Banking Department)

३) माहिती सुरक्षा विभाग (Information Security Department)

४) डेटा ॲनॅलिटिक्स विभाग (Data Analytics Department)

याशिवाय, चर्चांकरिता मोठे कक्ष (Executive Discussion Rooms) व जोखीम व्यवस्थापन (Risk Management) विभागासाठीही भविष्यात अतिरिक्त जागा लागणार आहे. तसेच किरकोळ बँकिंग (Retail Banking) व घाऊक बँकिंग (Wholesale Banking) व्यवसायवाढीला चालना देण्यासाठी या विभागांनाही त्यांच्या विस्तारासाठी संपूर्ण मजल्याची आवश्यकता भासणार आहे.

खाली नमूद केलेल्या काही विभागांनाही अतिरिक्त कार्यालयीन जागेची आवश्यकता आहे व हे विभागही प्रशासकीय कार्यालयाच्या इमारतीत स्थलांतरीत केले जाऊ शकतात:

१) ई-टीडीएस विभाग (E-TDS Cell)

२) एएमएल विभाग (AML Cell)

३) व्हिडियो केवायसी विभाग (Video KYC Cell)

४) सेंट्रलाईज्ड पेमेंट विभाग (Centralised Payment Cell)

५) शेअर विभाग (Share Department)

वरील काही विभाग प्रशासकीय कार्यालयाच्या इमारतीत स्थलांतरीत केल्यामुळे बँकेच्या वाशी येथील इमारतीतील माहिती-तंत्रज्ञान विभाग (Information Technology Department), डिजिटल बँकिंग विभाग (Digital Banking Department) व कर्मचारी प्रशिक्षण केंद्र (Staff Learning Centre) यांच्या विस्तारासाठी अधिक जागा उपलब्ध होऊ शकेल.

वरील सर्व बाबी लक्षात घेता, आपली बँक प्रशासकीय कार्यालयाच्या इमारतीवर अजून तीन मजले उभारण्याचे नियोजन करीत आहे. याकरिता, संबंधित यंत्रणांकडून आवश्यक परवानग्या मिळविण्याची प्रक्रिया चालू करण्यात आली आहे.

## १४. संचालक मंडळाची रचना

- **संचालक मंडळाची निवडणूक:**

आपल्या बँकेच्या संचालक मंडळाचा कार्यकाळ ऑगस्ट, २०२१ मध्ये संपला. २०२१ ते २०२६ या पुढील पाच वर्षांच्या कालावधीकरिता संचालक मंडळाची निवडणूक प्रक्रिया बँकेच्या उपविधी क्र. ५६, मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटीज ॲक्ट, २००२चे कलम ४५ व मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटीज रुल्स्, २००२च्या नियम १९ परिच्छेद (१) (अ) अंतर्गत सुरु करण्यात आली.

श्री. जयंत डी. पाटील, डिस्ट्रीक्ट डेप्युटी रजिस्ट्रार, मुंबई (१) शहर यांची संचालक मंडळाच्या या निवडणुकीकरिता रिटर्निंग ऑफिसर म्हणून नेमणूक करण्यात आली होती. दि. ३० सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या १०३व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत रिटर्निंग ऑफिसरनी वर्ष २०२१ ते २०२६ या कालावधीसाठी निवडून आलेल्या सदस्यांच्या नावाची घोषणा केली.

त्यानंतर, सर्वोच्च न्यायालयाच्या दि. २७ सप्टेंबर, २०२१च्या आदेशानुसार, ऑक्टोबर, २०२१ मध्ये अतिरिक्त तीन राखीव जागांकरिता (दोन महिला संचालक व एक SC / ST संचालक) निवडणूक घेण्यात आली. यामध्ये वर्ष २०२१ ते २०२६ या कालावधीकरिता तीन सदस्य निवडून आले. यामुळे संचालक मंडळातील सदस्यांची एकूण संख्या १९ झाली.

**संचालक मंडळातील १९ सदस्यांची नावे खालील प्रमाणे:**

१) श्री. गौतम ए. ठाकूर
२) श्री. एस. के. साखळकर
३) पद्मश्री एम. एम. कर्णिक
४) श्री. एस. एन. सवाईकर
५) श्री. के. व्ही. रांगणेकर
६) श्री. एच. एम. राठी
७) श्री. एस. व्ही. सौदागर
८) डॉ. (सौ.) ए. पी. सामंत
९) श्री. एस. एस. शिरोडकर
१०) श्री. एन. जी. पै
११) श्री. ए. जी. आंबेसकर
१२) श्री. एस. एम. लोटलीकर
१३) श्री. एस. एस. भांडारे
१४) श्री. के. डी. उमरूटकर
१५) श्री. एस. के. बॅनर्जी
१६) श्री. के. जी. मसुरकर
१७) डॉ. (सौ.) एस. ए. कामथ
१८) सौ. जी. एस. कुलकर्णी
१९) श्री. एम. बी. कदम

श्री. एस. एस. भांडारे यांचे दि. ५ फेब्रुवारी, २०२२ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

**नवीन तीन संचालकांचा परिचय खालीलप्रमाणे:**

➢ डॉ. (सौ.) एस. ए. कामथ या एम.डी. (जनरल मेडिसिन) FICP आणि FACP आहेत. त्यांच्या आजपर्यंतच्या कारकिर्दीत त्यांनी शेठ जी. एस. मेडिकल कॉलेज आणि के.ई.एम. रुग्णालय परेल, मुंबई तसेच लोकमान्य टिळक म्युनिसिपल मेडिकल कॉलेज व जनरल रुग्णालय शीव, मुंबई येथे डीन व औषध शास्त्राच्या प्राध्यापिका ही पदे भूषविली आहेत. याशिवाय टोपीवाला नॅशनल मेडिकल कॉलेज आणि बी.वाय.एल. नायर चॅरिटेबल रुग्णालय, मुंबई येथेही त्या प्राध्यापिका व औषध विभाग-प्रमुख होत्या. जीएसबीएस मेडिकल ट्रस्टच्या विश्वस्त मंडळावरही त्या कार्यरत आहेत.

- सौ. जी. एस. कुलकर्णी या व्यवसायाने इंटिरियर डिझायनर असून त्यांनी दिल्ली विद्यापिठातून इंटिरियर डिझायनर व डेकोरेशनचा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. त्यानंतर अमेरिकेतील मियामी येथूनही इंटिरियर डिझायनरचा एक अभ्यासक्रम त्यांनी पूर्ण केला आहे. त्या गोल्ड मेडलिस्ट व टॉपर असून कॉर्पोरेट इंटिरियर हे त्यांचे विशेष कार्यक्षेत्र आहे. याशिवाय, त्या सामाजिक क्षेत्रातही कार्यरत असून महिला कारागिर, वंचित कलाकार व अपंग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी कार्य करतात.

- श्री. एम. बी. कदम हे बी.ई. (इलेक्ट्रीकल) व एम.बी.ए. (मार्केटिंग व फायनान्स) आहेत. फ्रँकलीन टेम्पलटन इन्व्हेस्टमेंट्स आणि युटीआय ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लि. या वित्तीय संस्थांमध्ये त्यांनी काम केले आहे. सध्या ते ग्लोबल फायनान्शियल कंपनी सर्व्हिसेस (सह-संस्थापक व भागीदार) मध्ये कार्यरत आहेत. त्यांना निधी व्यवस्थापन, संपत्ती व्यवस्थापन तसेच ट्रेझरी व्यवस्थापनाचा गाढा अनुभव आहे.

आपल्या बँकेच्या संचालक मंडळाची रचना मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट २००२ व बँकेच्या

पोटनियमांनुसार केली जाते. सध्या आपल्या बँकेच्या संचालक मंडळात कार्यकारी संचालकांव्यतिरिक्त अठरा संचालक कार्यरत आहेत. यामध्ये बँकिंग व इतर क्षेत्रांतील अनुभवी व तज्ज्ञ संचालकांचा समावेश आहे. विद्यमान संचालक मंडळात एक चार्टर्ड अकाऊंटंट व सहा बँकर्स्‌चा समावेश आहे.

**श्री. गौतम ए. ठाकूर यांची बँकेच्या अध्यक्षपदी निवड:**

दि. ३० सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत २०२१ ते २०२६ या वर्षांकरिता निवडून आलेल्या संचालकांची घोषणा केल्यानंतर रिटर्निंग ऑफिसर श्री. जयंत डी. पाटील यांनी नवनिर्वाचित संचालक मंडळाची विशेष बैठक बोलाविली. यामध्ये श्री. गौतम ए. ठाकूर यांची बँकेचे अध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यात आली.

**श्री. एस. के. साखळकर यांची बँकेच्या उपाध्यक्षपदी निवड:**

नवनिर्वाचित संचालक मंडळाच्या दि. ३० सप्टेंबर, २०२१च्या विशेष बैठकीत श्री. एस. के. साखळकर यांची बँकेचे उपाध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यात आली.

अहवालवर्षी आपल्या बँकेच्या संचालक मंडळाच्या एकूण २५ सभा झाल्या.

**कार्यकारी संचालकांची नियुक्ती:**

सौ. स्मिता संधाने यांची दि. १ एप्रिल, २०१७ रोजी बँकेच्या कार्यकारी संचालकपदी पाच वर्षांकरिता नियुक्ती करण्यात आली होती. त्यांचा सेवेचा कालावधी दि. ३१ मार्च, २०२२ रोजी संपणार होता. विद्यमान कार्यकारी संचालकांची सेवानिवृत्ती लक्षात घेता, तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेच्या प्रचलित नियमांनुसार बँकेकडून विद्यमान कार्यकारी संचालकांच्या कार्यकालाची मुदत संपण्याच्या चार महिन्यांआधी नवीन कार्यकारी संचालकांच्या नियुक्तीसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेला कळविण्यात आले होते.

तसेच बँकेची व्यवसाय-वाढ बघता, ऑपरेशन्स (Operations) व बिझनेस (Business) या दोन्ही पैलूंवर लक्ष केंद्रीत करण्यासाठी दोन स्वतंत्र कार्यकारी संचालकांच्या नियुक्तीची आवश्यकता होती. त्याअनुषंगानेही, भारतीय रिझर्व्ह बँकेकडे दोन कार्यकारी संचालकांची नियुक्ती करण्यासाठी पत्रव्यवहार करण्यात आला.

यानुसार, दि. १ एप्रिल, २०२२ पासून सौ. आरती ए. पाटील यांची कार्यकारी संचालक - ऑपरेशन्स (Operations) व श्री. अभिजित व्ही. प्रभू यांची कार्यकारी संचालक - बिझनेस (Business) म्हणून नियुक्ती करण्यात आली.

सौ. आरती पाटील यांनी बी.कॉम., AICWA, CAIIB, Adance Management Programme (IIBF), Executive Post Graduate Programme in Business Management (SIES) या पदव्या प्राप्त केल्या आहेत. त्या नोव्हेंबर, १९९२ मध्ये प्रोबेशनरी ऑफिसर या पदावर बँकेत रुजु झाल्या. त्यांना बँकेचा सुमारे २९ वर्षांचा अनुभव आहे. कार्यकारी संचालकपदी नियुक्ती होण्याआधी त्यांनी बँकेत प्रोसेसिंग ऑफिसर, शाखाप्रमुख, रासेक प्रमुख, परिमंडळ प्रमुख, एसएमई प्रमुख, कोषागार प्रमुख, मुख्य महाव्यवस्थापक आणि उप-कार्यकारी संचालक - कोषागार, अकाऊंट्स्‌ व जोखीम व्यवस्थापन इत्यादी जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत.

सौ. आरती पाटील यांच्याकडे कंप्लायन्स (Compliance), जोखीम व्यवस्थापन (Risk Management), कोषागार (Treasury), अकाऊंट्स्‌ (Accounts), लेखा-परीक्षण (Audit), दक्षता (Vigilance), माहिती व तंत्रज्ञान (Information Technology), मानव संसाधन (HRD), विधी (Legal) व सर्व्हिसेस

(Services) इत्यादी विभागांच्या जबाबदाऱ्या असतील.

श्री. अभिजित प्रभू यांनी बी.ई. (Production Engineering), Master of Financial Management (MFM), CAIIB, AMFI, NCFM या पदव्या प्राप्त केल्या आहेत. ते नोव्हेंबर, १९९२ मध्ये बँकेत रुजु झाले. त्यांना बँकेचा सुमारे २९ वर्षांचा अनुभव आहे. त्यांनी बँकेत विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. यामध्ये किरकोळ बँकिंग (Retail Banking), घाऊक बँकिंग (Wholesale Banking), कॉर्पोरेट बँकिंग, एसएमई (SME), परिमंडळ कार्यालय, विदेश विनिमय (Forex - Trade Finance), माहिती व तंत्रज्ञान (IT-CBS Project) या विभागांचा समावेश आहे. कार्यकारी संचालकपदी नियुक्ती होण्याआधी ते रिटेल बँकिंग विभागाचे उप-कार्यकारी संचालक होते.

श्री. अभिजित प्रभू यांच्याकडे घाऊक बँकिंग (Wholesale Banking), किरकोळ बँकिंग (Retail Banking), क्रेडिट ॲडमिनिस्ट्रेशन, क्रेडिट इन्क्वायरी, विदेश विनिमय (Foreign Exchange), स्पेशल मेन्शन अकाऊंट्स् (SMA) व वसुली (SMA and Recovery), Data & Analytics इत्यादी विभागांच्या जबाबदाऱ्या असतील.

**बँकेच्या मुख्य जोखीम अधिकाऱ्याची नियुक्ती (Chief Risk Officer):**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या दि. २५ जून, २०२१च्या परिपत्रक क्र. RBI/२०२१-२२/६२ DOR. CRE (DIR).REC.26/२१.०४.१०३/ २०२१-२२ नुसार ₹ ५,००० कोटींपेक्षा अधिक मालमत्ता असणाऱ्या नागरी सहकारी बँकांनी मुख्य जोखीम अधिकाऱ्याची नियुक्ती करावी असे नमूद केले आहे. ह्या अधिकाऱ्याकडे बँकेत एकात्मिक जोखीम व्यवस्थापन प्रणालीची (Integrated Risk Management System) अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असेल.

या निदेर्शांनुसार आपल्या बँकेने दि. १४ ऑक्टोबर, २०२१ रोजी श्रीमती मालविका दळवी यांची बँकेच्या मुख्य जोखीम अधिकारीपदी नियुक्ती केली. त्या चार्टर्ड अकाऊंटंट आहेत व गेली ३१ वर्षे बँकेच्या सेवेत आहेत. त्यांच्या बँकिंग कारकिर्दीत त्यांनी मुलुंड, लिंकिंग रोड, गोरेगाव (पूर्व), मालाड व गोरेगाव (पश्चिम) या शाखांमध्ये शाखाप्रमुख म्हणून काम पाहिले आहे. तसेच एसएमई - नरिमन पॉईंट शाखेचे प्रमुखपदही सांभाळले. याव्यतिरिक्त त्यांनी कमर्शियल बँकिंग, किरकोळ (Retail) बँकिंग, कोषागार (Treasury) व जोखीम व्यवस्थापन (Risk Management) या विभागांमध्येही काम केले आहे. गेली पाच वर्षे त्या जोखीम व्यवस्थापन (Risk Management) विभागाच्या प्रमुख आहेत.

**व्यवस्थापन मंडळाची स्थापना (Board of Management - BOM):**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या दि. ३१ डिसेंबर, २०१९च्या परिपत्रक क्र. RBI/२०१९-२०/१२८ DOR (PCB).BPD.Cir. No. ८/१२.०५.००२/२०१९-२०नुसार नागरी सहकारी बँकांना त्यांचे व्यवस्थापन व बँकिंगविषयक कार्य व्यावसायिकरित्या अंमलात आणण्यासाठी बँकिंगमधील विशेष ज्ञान व अनुभव असलेल्या व्यक्तींचा समावेश असलेले व्यवस्थापन मंडळ (Board Of Management - BOM) स्थापन करण्याचे निर्देश दिले होते. यानुसार जून, २०२१ मध्ये आपल्या बँकेने विद्यमान संचालक मंडळातील तीन सदस्य आणि आर्थिक / बँकिंग व इतर क्षेत्रांतील तीन अनुभवी व तज्ज्ञ बाह्य व्यक्तींचा समावेश असलेल्या व्यवस्थापन मंडळाची (BOM) स्थापना केली. यानुसार श्री. एम. व्ही. टांकसाळे, सीए एम. आर. भडगांवकर

आणि श्री एम. पी. रेगे या बँकिंग व इतर क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश व्यवस्थापन मंडळात करण्यात आला.

त्यानंतर डिसेंबर, २०२१ मध्ये व्यवस्थापन मंडळाची (Board Of Management - BOM) पुनर्रचना करण्यात आली. यामध्ये संचालक मंडळातील तीन, तसेच बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञ व अनुभव असलेल्या तीन व्यक्तींची नियुक्ती करण्यात आली. बँकेच्या संचालक मंडळाने श्री. एस. के. बॅनर्जी यांची व्यवस्थापन मंडळाच्या (BOM) अध्यक्षपदी नियुक्ती केली.

व्यवस्थापन मंडळाचे सदस्य खालीलप्रमाणे:

| **संचालक मंडळातील सदस्य** | **बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य** |
|---|---|
| श्री. एस. के. बॅनर्जी (व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष) | श्री. एम. व्ही. टांकसाळे |
| श्री. एस. एस. भांडारे | श्री. ए. एस. मोकाशी |
| श्री. एस. एस. शिरोडकर | डॉ. व्ही वाय. तराळे |

श्री. एस. एस. भांडारे यांचे दि. ५ फेब्रुवारी, २०२२ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

व्यवस्थापन मंडळातील (Board Of Management - BOM) तज्ज्ञ सदस्यांचा परिचय खालीलप्रमाणे:

- श्री. एम. व्ही. टांकसाळे हे बीएससी, एम.ए. (English Literature), CAIIB, FCMA असून त्यांना भारतीय बँकिंग क्षेत्राचा ४० वर्षांचा अनुभव आहे. वर्ष २०१३ मध्ये ते सेंट्रल बँक ऑफ इंडिया मधून अध्यक्ष व कार्यकारी संचालक या पदांवरुन निवृत्त झाले. त्यापूर्वी त्यांनी युनियन बँक ऑफ इंडिया व पंजाब नॅशनल बँकेतही वरिष्ठ पदांवरील विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या होत्या. बँकेतील निवृत्ती पश्चात ते इंडियन बँक्स् असोसिएशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) होते. या पदावर असताना डिसेंबर, २०१३ ते ऑगस्ट, २०१६ मध्ये त्यांनी संपूर्ण बँकिंग क्षेत्राचे प्रतिनिधित्व केले. बँकिंग क्षेत्रात नवे तंत्रज्ञान व आधुनिक बँकिंग आणण्यात त्यांनी पुढाकार घेतला. याशिवाय, बँकिंग व वित्तीय क्षेत्रांतील व्यक्तींचे नेतृत्वगुण विकसित करुन नव्या नेतृत्वाला मार्गदर्शन करण्यातही ते अग्रेसर आहेत. त्यांच्या यशस्वी कारकिर्दीत त्यांनी अनेक संस्थांमध्ये महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या हाताळल्या आहेत.
- श्री. ए. एस. मोकाशी हे अनुभवी बँकर असून त्यांनी भारतीय स्टेट बँकेत ४० वर्षे कार्य केले आहे. जून, २०२१ मध्ये ते मुख्य महाव्यवस्थापक (Chief General Manager) या पदावरुन निवृत्त झाले. भारतीय रिझर्व्ह बँकेत 'क्रेडिट रिव्ह्यू विभाग' स्थापन करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. त्यांना कॉर्पोरेट क्रेडिट, एसएमई फायनान्स व अनुत्पादित कर्जांची पुनर्रचना / वसुली या बँकिंगमधील महत्त्वाच्या विभागांचा गाढा अनुभव आहे. सध्या ते इंडिया डेट रिझॉल्युशन कंपनी लि. (India Debt Resolution Company Ltd.) मध्ये भारतीय स्टेट बँक निदेर्शित संचालक म्हणून काम पाहतात. याशिवाय अनेक कंपन्यांमध्ये स्वतंत्र संचालक म्हणूनही त्यांची नियुक्ती झालेली आहे.
- डॉ. व्ही. वाय. तराळे यांना सहकारी बँकिंग क्षेत्राचा समृद्ध अनुभव असून त्यांनी चार दशके महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँकेत विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या. याशिवाय ते महाराष्ट्र स्टेट को-ऑप. असोसिएशन, मुंबईचे मुख्य कार्यकारी अधिकारीही (CEO) होते. त्यांनी नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राकरिता भारतीय रिझर्व्ह बँकेने स्थापन केलेली एसएलआर (SLR) समिति, महाराष्ट्र सरकारच्या सहकार

विभागाने स्थापन केलेली लेखा समिति व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या बाय-लॉज् (Bye-laws) समितिचे सदस्यपदही भूषविले आहे. सध्या ते महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक्स असोसिएशन, मुंबईचे तज्ज्ञ संचालक म्हणून कार्यरत आहेत.

**संचालकांना कर्जे:**

बँकेच्या कोणत्याही संचालकाने आपल्या बँकेकडून कोणत्याही प्रकारचे कर्ज घेतलेले नाही. ही आपल्या बँकेची गेल्या अनेक वर्षांची स्वागतार्ह व निकोप परंपरा आहे. याचे प्रावधान आपल्या बँकेच्या उपविधी क्र. ५५ आणि ६३(सी) मध्ये करण्यात आले आहे.

## १५. सभासद

दि. ३१ मार्च, २०२२ अखेरीस आपल्या बँकेचे पन्नास किंवा अधिक समभाग असणाऱ्या सभासदांची संख्या २,४६,६६३ इतकी झाली. तर नाममात्र सभासदांची संख्या १,२६,३१० इतकी आहे.

## १६. वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती

आर्थिक वर्ष २०२२-२३ करिता वैधानिक लेखापरीक्षक म्हणून मे. मुकुंद एम. चितळे आणि कंपनी, चार्टर्ड अकाउंटंट्स, दुसरा मजला, कपूर हाऊस, परांजपे बी. स्कीम, मार्ग क्र. १, विले पार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७ आणि मे. एम. पी. चितळे आणि कंपनी, चार्टर्ड अकाउंटंट्स, हमाम हाऊस, पहिला मजला, अंबालाल दोशी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ यांची नेमणूक करण्यासाठी हे संचालक मंडळ शिफारस करीत आहे.

## १७. जाहीर निवेदन

आपल्या बँकेने बँकेच्या ठेवींवरील विम्याचा दि. ३१ मार्च, २०२२ पर्यंतचा प्रिमियमचा हप्ता डिपॉझिट इन्शुरन्स ॲण्ड क्रेडीट गॅरंटी कॉर्पोरेशनकडे जमा केलेला आहे आणि सदर प्रिमियमपोटी कोणतीही रक्कम देणे बाकी नाही.

## १८. श्रध्दांजली

अहवालवर्षात आपल्या बँकेच्या ज्या सभासदांचे, कर्मचाऱ्यांचे व निवृत्त कर्मचाऱ्यांचे दु:खद निधन झाले, त्या सर्वांप्रती संचालक मंडळ आदरांजली अर्पण करीत आहे. त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात संचालक मंडळ सहभागी आहे.

बँकेचे वरिष्ठ संचालक श्री. सुनिल भांडारे यांचे दि. ५ फेब्रुवारी, २०२२ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. बँकेचे संचालक मंडळ त्यांच्या निधनाबद्दल आदरांजली व्यक्त करते. श्री. भांडारे हे जून, २०१६ पासून बँकेच्या संचालकपदी आहेत. अर्थविषयक क्षेत्राचा त्यांचा गाढा अभ्यास होता. ते टाटा स्ट्रॅटेजिक मॅनेजमेंट ग्रुपचे आर्थिक आणि सरकारी धोरणविषयक सल्लागार होते. याशिवाय ते बॉम्बे फर्स्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी व महाराष्ट्र इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिलचे मुख्य अर्थतज्ज्ञ होते. टाटा मॅनेजमेंट ट्रेनिंग सेंटर, पुणे यासह अनेक प्रतिष्ठित व्यवस्थापन संस्थांमध्ये ते अध्यापन करायचे. ते ॲसोकॅम (ASSOCHAM), इंडियन मर्चंट चेंबर्स् या संस्थांशीही संलग्न होते. ऑल इंडिया बँक डिपॉझिटर असोसिएशनचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. श्री. भांडारे यांनी बँकेच्या संचालक मंडळाला अनेक विषयांवर वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले, तसेच बँकेच्या प्रगतीसाठीही सक्रीय योगदान दिले.

## १९. कृतज्ञता

सर्व सभासद व खातेदार यांचे बँकेला लाभत असलेले सहकार्य व संचालक मंडळावर दर्शविलेला विश्वास, याबद्दल संचालक मंडळ त्यांचे सदैव ऋणी आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, केंद्रीय सहकारी निबंधक - नवी दिल्ली, सहकार आयुक्त व सहकारी निबंधक कार्यालय, पुणे - महाराष्ट्र, तसेच आपल्या बँकेचे बँकर्स्, कायदेशीर सल्लागार व लेखापरीक्षकांचे त्यांनी दिलेल्या मार्गदर्शन, पाठिंबा व सहकार्याबद्दल संचालक मंडळ ऋणी आहे. तसेच कर्नाटक, गोवा, गुजरात, मध्यप्रदेश व दिल्ली या राज्यांतील सहकारी निबंधकांचेही संचालक मंडळ आभार मानीत आहे. आपल्या बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी बँकेची उद्दीष्टे पूर्ण करण्याकरिता निष्ठेने व समर्पित भावनेने दिलेल्या योगदानाबद्दल तसेच ग्राहकांना उत्कृष्ट सेवा, प्रदान केल्याबद्दल संचालक मंडळ त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करीत आहे.

संचालक मंडळ सर्व सभासदांस आश्वस्त करु इच्छिते की, आपली बँक येणाऱ्या काळात सातत्यपूर्ण प्रगती करुन यशाची नवीन उंची गाठण्यासाठी प्रयत्नशील राहील. ही उद्दीष्टे गाठण्याकरिता संचालक मंडळ अविरत प्रयत्न करेल.

बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने

**गौतम एकनाथ ठाकूर**

अध्यक्ष

मुंबई, १३ मे, २०२२

**तळटीप:**

संचालक मंडळाचा संपूर्ण अहवाल इंग्रजीमध्ये सोबत दिला आहे. हा फक्त गोषवारा आहे.